क्रमांक : २५७७/क-२(संगणक)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ५ फेब्रुवारी, २०२०.

**::परिपत्रक ::**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणकीकरण प्रकल्पाअंतर्गत या सचिवालयाचे www.mls.org.in हे संकेतस्थळ (website) कार्यरत आहे. या संकेतस्थळावर (website) विविध कक्ष, भरती, ई-निविदा, ई-बूक, पत्रक भाग २, कार्यालयीन आदेश आणि दोन्ही सभागृहाशी संबंधित माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. संकेतस्थळाच्या अनुषंगाने विधानसभा / विधानपरिषद सभागृहांची तसेच या सचिवालयातील सर्व कक्ष इत्यादींशी संबंधित सर्व माहिती संकेतस्थळावर (website) दर्शविण्याकरीता आवश्यक असणारी सुविधा तसेच त्यात सुधारणा करण्याकरिता लागणारे मनुष्यबळ सद्यस्थितीत संगणक कक्षाकडे उपलब्ध आहे.

या संदर्भात विविध कक्षांकडून प्राप्त होणारी माहिती संगणक कक्षामार्फत संकेतस्थळावर (website) वर उपलब्ध करून देण्यात येते. परंतु, काही कक्षांनी अद्याप माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा दिलेली माहिती अद्ययावत केलेली नाही. त्याचप्रमाणे या सचिवालयाचे संकेतस्थळ अद्ययावत नसल्याचे काही सन्माननीय विधानमंडळ सदस्यांकडून निदर्शनास आणून देण्यात आले असल्याने संकेतस्थळ तातडीने अद्ययावत करण्याबाबत याद्वारे सुचित करण्यात येत आहे.

सबब या सचिवालयातील सर्व अधिकारी तथा कर्मचारी यांनी या सचिवालयाचे www.mls.org.in या संकेतस्थळावर (website) त्यांच्या कक्षाशी संबंधित माहिती तपासून घ्यावी व माहिती अद्ययावत नसल्यास अद्ययावत माहिती पी.डी.एफ (.PDF) किंवा एम.एस.वर्ड (MS word) या फॉरमॅट (Format) मध्ये सोमवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०२० रोजी पर्यंत संगणक कक्षाकडे पाठविण्याबाबत कटाक्षाने दक्षता घ्यावी.

**(शिवदर्शन साठ्ये)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

(१) मा.सभापती,(महाराष्ट्र विधानपरिषद),मा.अध्यक्ष,(महाराष्ट्र विधानसभा) यांचे सचिव तथा कार्यालय.
(२) मा.उप सभापती, (महाराष्ट्र विधानपरिषद),यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी तथा कार्यालय.
(३) मा.विरोधी पक्ष नेता (महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा),यांचे सचिव तथा कार्यालय.
(४) सचिव (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
(५) सचिव (M), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
(७) मुख्य सुरक्षा अधिकारी / अग्निक्षमन अधिकारी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.